# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ४३७/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.मनेश चंद्रकांत शिंदे**

रा.न्यु सलाईवाडा, सर्वोदयनगर
शिरोड नाकयाजवळ, सावंतवाडी
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,
बांदा, पोलीस स्टेशन बांदा,
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस
निरीक्षक, बांदा, पोलीस स्टेशन बांदा,
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.०५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.११.२०२० | -- | १०.१२.२०२० | २२.१२.२०२० |

तक्रारकर्ता यांनी दि. ०६.०३.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशानंतरही अद्यापपर्यंत सी.सी.टी.व्ही.फुटेज पुरविले नाहीत. "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.०५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी ऑनलाईन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"

1. *बांदा पोलीस ठाणेमधील दि.०२/०९/२०२० रोजी सकाळी १०.०० वा.ते १४.०० वा.या मुदतीतील प्रभारी अधिकारी व ठाणे अंमलदार यांचे कक्षातील सीसीटीव्ही फुटेज मिळावेत.*
2. *बांदा पोलीस ठाणेमधील दि.०४/०९/२०२० रोजी सकाळी ०९.०० वा.ते रात्री २३.३० वा. या मुदतीतील ठाणे अंमलदार यांचे कक्षातील सीसीटीव्ही फुटेज मिळावेत.*
3. *आपले नेमणूकी मनेश चंद्रकांत शिंदे पोकॉ/ ११५३ व महेश कृष्णा भोई, पोकॉ/४०५ यांची मा.पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचेकडील आदेश क्र.८/आशा/प्राचौ/पोकॉ-११५३-४०५/६१९९/२०५२० दि.०४/०३/२०२० अन्वये नेमण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांना पुरविण्यात आलेले बांदा पोलीस ठाणेमधील सीसीटीव्ही फुटेज मिळावेत. "*

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांनी दिनांक ३०.११.२०२० रोजीच्या अर्जान्वये माहितीची मागणी जन माहिती अधिकारी, पोलीस निरीक्षक, बांदा पोलीस ठाणे यांचेकडे केली होती. त्यानंतर झालेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे समोर दि.२२.१२.२०२० रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर प्रथम अपिल सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, बांदा पोलीस ठाण्यातील सी.सी.टिव्ही फुटेज मधील हार्ड डिस्क करप्ट झाली असल्याने प्राथममिक चौकशीकामी चौकशी अधिकारी पोलीस निरीक्षक, वैभववाडी यांना सी.सी.टीव्ही फुटेज उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. त्यामुळे मागणी करण्यात आल्याप्रमाणे सी.सी.टीव्ही

फुटेज उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेसमोर असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी बॅड पॅचचे कारण सांगून चित्रिकरणाची चित्रफित देण्याचे नाकारले आहे. मात्र माहिती ज्या अवस्थेत आहे, तशी त्यांनी पुरविणे क्रमप्रातप्त व अपरिहार्य असूनही त्यांनी माहिती देण्याचे अव्हेरले आहे. त्यानंतर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी पोलीस निरीक्षक बांदा यांचे अभिलेखावरील उपलब्ध माहिती ज्या स्थितीत आहे तशी पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षीत उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसात पाठवावे, असे आदेश पारित केले आहेत.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या या आदेशाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०४.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले की, सी.सी.टीव्हीचे फुटेज मिळणेबाबत दि.११.०९.२०२० रोजीच्या पत्रान्वये सीनर्जी अक्षय उर्जा कुडाल यांना पत्र देऊन सीसीटीव्ही स्टोरेज करुन देण्याची विनंती करण्यात आली होती. त्याप्रमाणे सीनर्जी अक्षय उर्जा कुडाळ यांचे तांत्रिक कर्मचारी बांदा पोलीस ठाण्यात येऊन सी.सी.टीव्ही फुटेज संकलीत करण्याचा प्रयत्न केला असता, सदर कॅमेऱ्यांचे हार्ड डिस्कवर बॅड पॅचेस निर्माण झाल्याचे दिसून आल्याने सीसीटीव्ही फुटेज मिळत नसल्याचे कळविले आहे.

त्यानंतर दि.१९.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये टेक्नोसॉफ्ट प्रा.लि.नागपूर कॅम्प सावंतवाडी यांचे प्रतिनिधी श्री.देवानंद अंबाडकर यांना पत्र देण्यात आले होते. त्यांनीही बांदा पोलीस ठाण्यात भेट देऊन, सी.सी.टीव्ही कॅमेरे पाहणी करुन सदर हार्ड डिस्क करप्ट झाल्याने फुटेज विकसित होणार नसल्याचे कळवून सदर करप्ट हार्ड डिस्क त्यांनी आपले ताब्यात घेवून त्यातील डाटा रिकव्हर करण्यासाठी कंपनीचे नागपूर येथील कार्यालयात पाठविला होता.

नागपूर येथून सदरची हार्ड डिस्क पाठविली असून ती करप्ट झाली असल्याने चालू (ओपन) होत नसल्याने त्यातील डाटा रिकव्हर होत नाही. त्यामुळे सी.सी.टीव्ही फुटेज डेव्हलप करुन देणे शक्य नसल्याचे कंपनीचे तांत्रिक कर्मचारी श्री.देवानंद आंबाडकर यांनी कळविले आहे.

या सर्व गोष्टींवरुन असे लक्षात येते की, एकूणच याप्रकरणात तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे सदरची हार्ड डिस्क करप्ट झाल्याचे नमूद करुन अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी टेक्नोसॉफ्ट सोल्यूशन प्रा.लि.नागपूर या कंपनीचे प्रतिनिधी श्री.देवानंद आंबाडकर यांना सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी टेक्नोसॉफ्ट सोल्यूशन प्रा.लि.नागपूर या कंपनीचे प्रतिनिधी श्री.देवानंद आंबाडकर यांना पुढील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळवावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२४.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ मे, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
श्री.देवानंद लक्ष्मण आंबाडकर, टेक्नोसॉफ्ट सोल्यूशन प्रा.लि.नागपूर.

**- यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, बांदा
पोलीस स्टेशन बांदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग.
**यांचेमार्फत रवाना.**